महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जन संपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय

सेक्टर नं. ५,राम नगर शांतीगार्डन मिरारोड पुर्व ,ठाणे ४०११०७
Ph.No. 022/29451003.
mail to :- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट** दिनांक : १३/०३/२०२१

**महिलांचे गळयातील चोरी करणा-या सोन साखळी चोरास तात्काळ जेरबंद करुन त्याच्याकडुन १५ ग्रॅम वजनाची एकुण ६५ ,०००/- रुपये किंमतीची सोन्याची चैन हस्तगत करण्यास भाईदर पोलीस ठाण्यास यश .**

भाईदर पोलीस ठाणे हद्दीत आज दि १३/०३/२०२१ रोजी दुपारी १२-०० वा.चे सुमारास एक ६५ वर्ष वयाची एक वृध्द महिला ही मंदिरातुन देव दर्शन घेवुन आपले राहते घरी अमर अपार्टमेन्ट, बेकरी गल्ली, भाईंदर पश्चिम य इमारतीत जिन्या वरुन जात असतांना पाठी मागुन एका इसमाने येवुन ''आन्टी उपर जाना है साईड हो जाव '' असे सांगुन पाठी मागुन गळयात हात टाकुन गळयातील १५ ग्रॅम वजनाची ६५,०००/- रुपये किमतीची सोन्याची चैन चोरी करुन पळुन जात असतांना सदरची महिला ही '' चोर चोर '' असे ओरडल्याने आजुबाजुचे लोक त्याचे मागे पळत असतांना त्या दरम्यान बिट मार्शलचे कर्मचारी पोहवा/ रविंद्र बेलदार, पो. ना / छोटु साबळे यांनी सदर चोरटय इसमाचा पाठलाग करुन शिताफीने त्यास पकडुन नमुद इसमास ताब्यात घेवुन भाईदर पोलीस ठाण्यात घेवुन आले. नमुद चोरटया इसमांकडे कसोशिने चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव जितेश धिरेंद्र झा, वय- ३४ वर्षे,रा. चावरे ऑरचिड बिल्डींग, बी/३०३, स्टेशन रोड, नालासोपारा पश्चिम अशी माहिती दिली. नमुद इसमाची अंगझडती घेतली असता नमुद इसमाचे ताब्यात १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन मिळुन आली आहे. सदर घडलेल्या घटनेवरुन भाईदर पोलीस ठाण्यात गु. रजि. नं. I ९१/२०२१ भादविसक ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन गुन्हयांचा तपास चालु आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा.पोलीस उपआयुक्त श्री. अमीत काळे ,परिमंडळ – १, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. शातीलाल जाधव यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत द. भोसले, पो. उपनिरीक्षक युवराज शिरसाठ, म.पो.उपनिरी. मनिषा पाटील,पोहवा/ रविंद्र बेलदार,पो.ना./छोटु साबळे व पोलीस स्टाफ यांनी केला आहे.

Scanned with CamScanner